# यवतमाळ जिल्हा पोलीस राजपत्र
# दिनांक - 19/08/2020

राजपत्रातील ०६ भाग –

| | |
|---|---|
| भाग – ०१ | **बदली /नेमणुक /पदोन्नती** |
| भाग – ०२ | **रजा** |
| भाग – ०३ | **वेतन/भत्ते / रोखिकरण** |
| भाग – ०४ | **बक्षिस / मानधन** |
| भाग – ०५ | **शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती** |
| भाग – ०६ | **प्रशिक्षण व इतर** |

मा. पोलीस अधीक्षक,
यांचे मान्यतेनुसार

( एम. एम. बागवान )
पोलीस उप अधी.(मुख्या)
पोलीस अधीक्षक यवतमाळ करीता

**प्रति,**

प्रभारी अधिकारी, सायबर सेल यवतमाळ :– सदरचे गॅझेट हे जिल्हा पोलीस दल यवतमाळ चे www.yavatmalpolice.gov.in या अधिकृत संकेत स्थळावर GAZETTE या मथळयाखाली प्रसिद्ध करावे. तसेच जिल्हयातील प्रत्येक पोस्टे./उपविपोअ./अधिकारी यांचे E - Mail वरती पाठवावे.

# भाग २ - रजा

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/राजगडकर/ 6790 /२०२० यवतमाळ ,दि. 19 AUG 2020

<u>आदेश</u>

श्रीमती सुषमा राजगडकर कश्रेली हयांची तब्येत ठिक नसल्याने त्यांना **दि.१७/०८/२०२० ते १९/०८/२०२० पर्यंत एकुण ३** दिवस अर्जीत रजा मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेला कार्यासनास अतिरीक्त कार्यभार श्रीमती सरिता सुर्यवंशी , कश्रेली यांच्या कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
**प्र.कार्यालय अधीक्षक**
**पोलीस अधीक्षक यवतमाळ**
**करीता**

प्रति,

१. श्रीमती सुषमा राजगडकर,कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्रीमती सरिता सुर्यवंशी कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा/डिपीजी लिपीक

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\LEAVE NOT SHEET-2020.docx

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/हगवणे/6791 /२०२०　　　　　　　　　　　　　　　　　　　　यवतमाळ ,दि. 19 AUG 2020

<u>आदेश</u>

श्री.ए.डी.हगवणे, वश्रेली यांना धार्मीक कामा करिता पुसद येथे जाणे असल्याने त्यांना **दि.२६/०८/२०२० ते २८/०८/२०२० पर्यंत एकुण ३** दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेला पत्रव्यवहार लिपीक-२ या कार्यासनास अतिरीक्त कार्यभार श्री.सचिन राजुरकर, कश्रेली यांच्या कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्री.ए.डी.हगवणे वश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्री.सचिन राजुकर कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक पत्रव्यवहार शाखा/डिपीजी लिपीक

C:\Documents and Settings\Administrator\Desktop\LEAVE NOT SHEET-2020.docx

6792

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/झिले/ /२०२० यवतमाळ ,दि. 19 AUG 2020

## आदेश

श्री.नविन झिले कश्रेली यांना धार्मीक कामा करिता **दि.२४/०८/२०२० ते २८/०८/२०२० पर्यंत** एकुण ५ दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेला कार्यासनास अतिरीक्त कार्यभार श्री.ओमदेव कुंडलवार , कश्रेली यांच्या कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्री.नविन झिले,कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्री.ओमदेव कुंडलवार कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक लेखा शाखा/डिपीजी लिपीक

6812

क्र.पोअय/पलि-२/अ.रजा/महल्ले/ /२०२० यवतमाळ ,दि. 19 AUG 2020

## आदेश

श्री.दिगंबर महल्ले कश्रेली यांना धार्मीक कामा करिता **दि.२६/०८/२०२० ते २८/०८/२०२० पर्यंत** एकुण ३ दिवस अर्जीत रजा शासकिय सुटीला जोडुन मुख्यालय सोडण्याचे परवानगी सह मंजूर करण्यात येत आहे,त्यांचे रजेच्या काळात त्यांचे कडे असलेला कार्यासनास अतिरीक्त कार्यभार श्री.फिरोज खान, कश्रेली यांच्या कडे सोपविण्यात यते आहे.

**(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)**

(सुशिला पवार )
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक यवतमाळ
करीता

प्रति,

१. श्री.दिगंबर महल्ले,कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

२. श्री.फिरोज खान कश्रेली पो.अ.कार्यालय यवतमाळ

प्रत : पोउअधीक्षक मुख्यालय यवतमाळ /प्रमुख लिपीक लेखा शाखा/डिपीजी लिपीक

6823

क्रमांक :- पोअय/सआली-1/कर्तव्यावर हजर-कर्मचारी/ /2020 यवतमाळ, दिनांक :-

विषय :- हजर करुन घेणे बाबत 19 AUG 2020

--- 000 ---

**सपोउपनि/384 प्रकाश चंपतराव पेंन्दोर नेमणुक, पो.नि.कक्ष यवतमाळ** हे दि 10/02/2020 ते 19/08/2020 (191दिवस) सिक रजेवर होते. ते दिनांक 19/08/2020 रोजी कर्तव्यावर हजर होणे करीता आले असुन त्यांना कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच त्यांचा दिनांक 10/02/2020 ते 19/08/2020 पर्यंतचा सिक कालावधी खालील प्रमाणे मंजुर करण्यात येत आहे.

10/02/2020 ते 25/02/2020 बिनपगारी रजा 15 दिवस
26.02.2020 ते 25.04.2020 परावर्तीत रजा 60 दिवस
26/04/2020 ते 19/08/2020 बिनपगारी रजा 116 दिवस

**(मा.पो.अ यांचे आदेशान्वये)**

(सुशिला पवार)
प्र. कार्यालय अधिक्षक
पोलीस अधिक्षक,यवतमाळकरित

प्रति,

ठाणेदारः- पो.नि.कक्ष.यवतमाळ.

प्रतः- वेतन लिपीक 01/डिपीजी लिपीक यांना माहिती योग्य त्या कार्यवाहिस्तव

**क्रमांक- सआली-5 /सिक रजा /पोना/2059/2020** 6824 यवतमाळ दिनांक -

19 AUG 2020

## आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी यांचा नमुद हे आज दि.19/8//2020/रोजी सिक मधुन कर्तव्यावर हजर झाले असुन त्याच्या नमुद वैदयकीय कालावधी हा म.ना.से.रजा नियम 1981 चे नियम क्रमांक (61) च्या अधिनं राहुन खालील प्रमाणे रजा मंजुर करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पो.कर्मचारी नाव व पद.ब.नं. | नेमणुक | मंजुर वैदयकीय कालावधी |
|---|---|---|---|
| 1 | पोना/2059,सुधीर पुसदकर | पो.स्टे.अवधुतवाडी | दि.06/07//2020/ते15/8/ 2020/ पर्यत एकुन 39 दिवस **परावर्तीत** रजा मंजुर करण्यात येत आहे. |

**(मा.पोलीस अधिक्षक यांचे आदेशान्वये)**

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधिक्षक ,
पोलीस अधिक्षक यवतमाळ करिता

**प्रति,**
**पोनि- पो.स्टे अवधुतवाडी.**

**प्रत - वेतन लीपीक 1 यांना / -डीपीजी लीपीक कार्यवाहिस व माहीतीस.**

# भाग ३ - वेतन/भत्ते / रोखिकरण

क्र.पोअय/प्रलि/८०-सी/सुधारित वेतननिश्चिती-सपोनि-**रावसाहेब पवार** / 6795 /२०२० यवतमाळ, दि. 19 AUG 2020

**आदेश**

सहायक पोलीस निरीक्षक, **रावसाहेब दगडू पवार** (स्वेच्छा सेवानिवृत्त दि.३१/१०/२०१७) यांची पोलीस प्रशिक्षण केंद्र, नानवीज दौंड येथे त्यांचेकडील आदेश दि.२७.११.२०१५ अन्वये वेतननिश्चिती करून खालील **स्तंभ अ** प्रमाणे वेतनवाढी मंजूर केल्या होत्या.

वेतन पडताळणी पथक, अमरावती यांनी वेतनपडताळणीचे वेळी घेतलेल्या आक्षेपाची पूर्तता करणेच्या अनुषंगाने त्यांची सुधारित वेतन निश्चिती करण्यात येऊन त्यांना खालील नमूद **स्तंभ-अ** प्रमाणे देण्यात आलेल्या वेतनवाढीमध्ये बदल करुन **स्तंभ-ब** मध्ये नमूद केल्याप्रमाणे सुधारित वेतनवाढी (भाग-१ व भाग-२ प्रमाणे ) मंजूर करण्यात येत आहेत.

**वेतन बॅन्ड : - पोलीस उप निरीक्षक :- 9300—34800 ग्रेड वेतन—4300**

**भाग-०१**

| दिलेले वेतन-स्तंभ-अ | | | देय वेतन-स्तंभ-ब | | |
|---|---|---|---|---|---|
| वेतनवाढीचा दिनांक | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन | वेतनवाढीचा दिनांक | वेतनबॅण्ड | ग्रेड वेतन |
| ०१/०७/२०११ | १३४७०/- | ४३००/- | ०१/०७/२०११ | १३४७०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१२ | १३४७०/- (दि.२३.१२.११ ते ०६.०७.१२ पर्यंतचा कालावधी विनावेतन झालेने वेतनवाढीसाठी ०६ महिने सेवा पूर्ण झालेली नसल्याने वेतनवाढ देय नाही.) | ४३००/- | ०१/०७/२०१२ | १३४७०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१३ | १३४७०+५४०=१४०१०/- | ४३००/- | ०१/०७/२०१३ | १३४७०+५४०=१४०१०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१४ | १४५६०/- | ४३००/- | ०१/०७/२०१४ | १४५६०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१५ | १५१२०/- | ४३००/- | ०१/०७/२०१५ | १४५६०+५७०=१५१३०/- | ४३००/- |
| ०१/०७/२०१६ | १५७१०/- | ४३००/- | ०१/०७/२०१६ | १५१३०+५९०=१५७२०/- | ४३००/- |
| **दि.०२/०२/२०१७ पासून सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नती.** | | | | | |
| दि.०२/०२/२०१७ सहायक पोलीस निरीक्षक पदावर पदोन्नतीने हजर | १५७१०/- कनिष्ठ पदात दि.०१/०७/१७ रोजीची नियमित वेतनवाढ मंजूर करुन वेतननिश्चितीचा विकल्प दिल्याने वेतननिश्चिती नाही. फक्त पदोन्नतीचे पदाचे ग्रेड वेतन मंजूर. | ४४००/- | दि.०२/०२/२०१७ | १५७२०/- | ४४००/- |
| दि.०१/०७/२०१७ पोलीस उप निरीक्षक पदात वेतनवाढ | १५७१०+६००=१६३१० विकल्पानुसार कनिष्ठ पदात दि.०१/०७/२०१७ ची नियमित वेतनवाढ मंजूर. | ४३००/- | दि.०१/०७/२०१७ | १५७२०+६००=१६३२० | ४३००/- |
| दि.०१/०७/२०१७ | १६३१०+६२०=१६९३० विकल्पानुसार स.पो.नि.पदात | ४४००/- | दि.०१/०७/२०१७ | १६३२०+६२०=१६९४० | ४४००/- |

## भाग-०२/सातव्या वेतन आयोगाप्रमाणे सुधारित वेतननिश्चिती

महाराष्ट्र शासन वित्त विभाग, शासन निर्णय क.वेपूर–2018/प्र.क.44/सेवा–9, दि.01 जानेवारी, 2019, महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग कमांक वेपूर 2019/प्र.क.1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 व शासन परिपत्रक क.वेपूर–2019/प्र.क.8/सेवा–9, दि.20/02/2019 अन्वये महाराष्ट्र राज्यातील अधिकारी व कर्मचारी यांना 7 व्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतन संरचना दिनांक 01 जानेवारी 2016 पासून लागू करण्यात आलेली आहे. त्यानुसार सपोनि/रावसाहेब पवार (सेवानिवृत्त दि.31.10.2017) यांची या कार्यालयाचे दि.01.07.2019 चे आदेशान्वये दि.01/01/2016 पासून सुधारित वेतन मॅट्रिक्समध्ये वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे.

तथापी सेवानिवृत्त सपोनि/रावसाहेब पवार यांचे सेवापुस्तक वेतनपडताळणी करिता, वेतनपडताळणी पथक, अमरावती यांचेकडे पाठविले असता, पडताळणीचे वेळी लेखाधिकारी, वेतनपडताळणी पथक, अमरावती यांनी, काढलेल्या आक्षेपानुसार त्यांची वरीलप्रमाणे भाग–1 नुसार सहाव्या वेतन आयोगानुसार सुधारित वेतननिश्चिती करण्यात आलेली आहे. त्यामुळे सपोनि/रावसाहेब पवार यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे स्तंभ "अ" मध्ये मंजूर वेतनवाढ आदेशात फेरबदल करून त्यांना स्तंभ "ब" मधे नमुद केल्याप्रमाणे सुधारित वेतनवाढी मंजूर करण्यात येत आहेत.

**वेतन संरचना :–**

| पदनाम | विद्यमान वेतन संरचना–वेतनबॅण्ड | सुधारित वेतन संरचना–वेतन मॅट्रीक्स |
|---|---|---|
| पोलीस उप निरीक्षक | 9300–34800 ग्रेड वेतन–4300 | 38600–122800 **(S-14)** |

| दिलेले वेतन–स्तंभ–अ | | | | देय वेतन–स्तंभ–ब | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| दि.01/01/2016 चे मूळ वेतन–15120+4300=19420<br>19420 **x** 2.57=49909.4 वेतन मॅट्रीक्स **(S-14/L-10)** नुसार दि.01/01/2016 चे वेतन–50400 | | | | दि.01/01/2016 चे मूळ वेतन–15130+4300=19430<br>19430 **x** 2.57=49935.1 वेतन मॅट्रीक्स **(S-14/L-10)** नुसार दि. 01/01/2016 चे वेतन–50400 | | | |
| वेतनवाढ दिनांक | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन | वेतनवाढ दिनांक | वेतन | वेतनवाढीची रक्कम | एकूण वेतन |
| 01/01/2016 | 50400 | –– | 50400 | 01/01/2016 | 50400 | –– | 50400 |
| 01/07/2016 | 50400 | 1500 | 51900 | 01/07/2016 | 50400 | 1500 | 51900 |
| 02/02/2017<br>पोउपनि ते सपोनि पदी पदोन्नती–वेतन मॅट्रीक्स **S-15/L-9** | 53000 | –– | 53000 | 02/02/2017<br>पोउपनि ते सपोनि पदी पदोन्नती–वेतन मॅट्रीक्स **S-15/L-9** | 53000 | –– | 53000 |
| 01/07/2017 (पदोन्नती पूर्वीचे पदात नियमित वेतनवाढ–<br>वेतन मॅट्रीक्स **S-14/L-12)** | 51900 | 1600 | 53500 | 01/07/2017<br>(पदोन्नती पूर्वीचे पदात नियमित वेतनवाढ–<br>वेतन मॅट्रीक्स **S-14/L-12)** | 51900 | 1600 | 53500 |
| 01/07/2017<br>पदोन्नतीची वेतनवाढ<br>वेतन मॅट्रीक्स **S-14/L-13** | 53500 | 1600 | 55100 | 01/07/2017<br>पदोन्नतीची वेतनवाढ<br>वेतन मॅट्रीक्स **S-14/L-13** | 53500 | 1600 | 55100 |
| 01/07/2017<br>सपोनि पदाचे निश्चित देय वेतन<br>वेतन मॅट्रीक्स **-S-15/L-** 11 | 56200 | –– | 56200 | 01/07/2017<br>सपोनि पदाचे निश्चित देय वेतन<br>वेतन मॅट्रीक्स **-S-15/L-** 11 | 56200 | –– | 56200 |

**वरीलप्रमाणे करण्यात आलेल्या वेतननिश्चितीमुळे देय होणारी थकबाकी प्रदान करण्याची कार्यवाही,** ही महाराष्ट्र नागरी सेवा (सुधारित वेतन) नियम–2019 व शासन अधिसूचना वित विभाग कमांक वेपूर 2019/प्र.क. 1/सेवा–9, दि.30 जानेवारी 2019 मधील नियम कमांक 14 मधील तरतुदीनुसार करण्यात यावी. सदरच्या वेतननिश्चितीमध्ये वेतन पडताळणीचे वेळी काही विसंगती आढळून आल्यास किंवा अतिप्रदान झाल्याचे निदर्शनास आल्यास अतिप्रदानाची वसुली भविष्यात प्रदान करण्यात येणाऱ्या कोणत्याही रकमेतून वसुल करण्यात येईल.

**(एम. राज कुमार )**
**पोलीस अधीक्षक,यवतमाळ.**

प्रति,

वेतन लिपीक-२/डी.पी.जी.लिपीक

# भाग ५ - शिक्षा/ निलंबन / सेवानिवृत्ती

क्रमांक :- पोअय/डिपी/३१-बी/निलंबन गैरहजेरी/ 6807 /२०२० यवतमाळ दिनांक

19 AUG 2020

## आदेश

खालील नमुद पोलीस कर्मचारी हे निलंबीत असुन त्यांचे निलंबन काळात पोलीस मुख्यालय यवतमाळ हे त्यांचे मुख्यालय निश्चीत करण्यात येवुन पोलीस उप अधिक्षक (मुख्या) यवतमाळ यांचे पुर्व परवानगी शिवाय मुख्यालय सोडु नये तसेच निश्चीत केलेल्या मुख्यालयात नियमीत न चुकता हजेरी द्यावी असे आदेशीत करण्यात आले आहे.

प्रकरणी खालील नमुद पोलीस कर्मचारी हे त्यांचे निलंबन काळात त्यांचे नावासमोर दर्शविल्याप्रमाणे दिनांकास हजेरीवर गैरहजर मिळुण आले आहे. करीता त्यांचे नमुद गैरहजर कालावधीतील निर्वाह भत्ता वरील महागाई भत्ता **नामंजुर** करण्यात येत आहे.

| अ.क्र. | पोलीस कर्मचारी यांचे नाव व पदनाम | नेमणुक | निलंबनात पोलीस मुख्यालय येथे हजर झाल्याचा दिनांक | माहे ०७/२०२० मध्ये हजर असलेले दिवस | माहे ०७/२०२० मधील गैरहजर दिवस |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पोहवा/१६७९ सुभाष राठोड | पोलीस मुख्यालय यवतमाळ | दि.१५/०६/२०२० | ०० | **३१** |
| ०२ | पोशि/२६३६ शेख मुनिर | पोलीस मुख्यालय यवतमाळ | दि. ०५/०६/२०२० | ०० | **३१** |
| ०३ | नापोशि/६०७ मो.बदर शेख | पोलीस मुख्यालय यवतमाळ | दि. ०६/०७/२०२० | ०५ | **२६** |

**( एम. राज कुमार )**
पोलीस अधीक्षक, यवतमाळ.

**प्रति,**

१) पोहवा/१६७९ सुभाष राठोड, २) पोशि/२६३६ शेख मुनिर, ३) नापोशि/६०७ मो.बदर शेख.
सर्व नेमणुक पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**मार्फत :-** राखीव पोलीस निरीक्षक, पोलीस मुख्यालय यवतमाळ.

**२/- उपरोक्त नमुद पोलीस कर्मचारी निलंबन काळात विनापरवानगी गैरहजर आढळुन आल्यास त्यांना आपले कार्यालयाकडुन नोटीस बाजावण्यात यावी.**

**प्रत :-** वेतन लिपीक-०१/आस्थापना लिपीक/राजपत्र लिपीक/पोउपअधि(मुख्या)
यांना माहीती व आवश्यक कार्यवाहीस.

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/सपोउपनि-६२ विजय राठोड/ 6809 /२०२० यवतमाळ दि. 19 AUG 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** सपोउपनि/६२ विजय राठोड, नेमणुक, पो.स्टे. दिग्रस.

**दोषारोप :-**

१) आपण सफौ-६२ विजय राठोड पो.स्टे.आर्णी येथे कार्यरत असतांना आपण दुरक्षेत्र जवळा येथे बिट अमलदार म्हणुन काम करीत होते. दि.१०/०६/२०१५ रोजी फिर्यादि शेख अब्दुल रहीम शेख नुर रा.जवळा यांनी दिलेल्या तक्रारी वरुन ट्रॅक्टर क्रमांक एम.एच.२९ व्ही २३८९, ट्राली क्र.एम एच २९ व्ही ६६९६ चे चालकाविरुध्द पो.स्टे.आर्णी येथे अप क्र. २६५/२०१४ कलम २७९,३०४(अ) भादवी चा गुन्हा नोंद झाला होता. सदर गुन्हयाचा तपास पोहवा-७६ सुरेश झोटींग यांचेकडे देण्यात आला होता. सदर गुन्हयाचे तपासा दरम्यान पोहवा-७६ झोटींग यांची पो.स्टे.आर्णी येथुन पो.स्टे.यवतमाळ ग्रामीण येथे बदली झाल्याने त्यांना डिसेंबर २०१४ मध्ये कार्यमुक्त केल्याने त्यांचेकडे तपासावर असलेला गुन्हा अप क्र. २६५/२०१४ कलम २७९,३०४(अ) भादवी आपणाकडे देण्यात आला होता.

२) अप क्र. २६५/२०१४ कलम २७९,३०४(अ) भादवी गुन्हयाचे मुळ कागदपत्र आपण तपासा दरम्यान अ फायनल तयार केल्याचे सांगत असुन सन २०१४ क्राईम रजीस्टरची पाहणी केली असता अ फायनल क्र. ९५/१५ दि.३०/०५/२०१५ असे नमुद आहे. परंतु जावक क्रमांक नमुद केलेला नाही. तसेच पो.स्टे.जावक रजीस्टरची पाहणी केली असता सदर अ फायनल जावक केल्याचे दिसुन येत नाही. यावरुन आपण अप क्र.२६५/१४ कलम २७९,३०४ (अ) भादवि तपासावर असतांना नमुद गुन्हयाचे मुळ कागदपत्र गहाळ केल्याचे दिसुन येते.

३) अप क्र.२६५/२०१४ कलम २७९,३०४ (अ) भादवि गुन्हयाचे तपासादरम्यान आपण नमुद गुन्हयाचे मुळ कागदपत्रे गहाळ केले आहे ही अतिशय गंभीर बाब आहे. शिस्तबध्द अशा पोलीस खात्यात जबाबदार पदावर कार्यरत असतांना आपण कर्तव्यात अतिशय बेजबाबदारपणा, निष्काळजीपणा व हलगर्जीपणा केल्याचे दिसुन येते.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/विचौ/सफौ-६२ राठोड/१३०४२/२०१९, दिनांक १९/११/२०१९ अन्वये विभागीय चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर विभागीय चौकशीत अपचारी यांचे बेजबाबदारपणाचे कृत्यामुळे गुन्हयाचे मुळ कागदपत्र गहाळ केल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस खात्यात असता अशोभनीय व गैरशिस्तीच्या वर्तना बाबत **आपणास मुंबई पोलीस (शिक्षा आणी अपीले ) नियम १९५६ मधिल (३)(२)(v) मधिल तरतुदीनुसार पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (०२) वर्षाकरीता (अपरिणामकारक) स्थगीतीची शिक्षा का देण्यात येवू नये ?** म्हणुन दिनांक ०५/०६/२०२० अन्वये कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदरची कारणे दाखवा नोटीस दि.०१/०७/२०२० रोजी स्विकारली. परंतु आपण सदर प्रकरणी लेखी स्पष्टिकरण सादर केलेले नाही. अंतिम आदेश निर्गमित करण्या पुर्वी अपचारी यांना त्यांचे मौखिक म्हणने मांडण्याकरीता दि. ०४/०८/२०२० रोजी आज्ञांकित कक्षात बोलविण्यात आले असता नमुद दिनांकास आज्ञांकीत कक्षात हजर न झाल्याने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याव्दारे, अपचारी सपोउपनि/६२ विजय राठोड, नेमणुक पो.स्टे. दिग्रस यांना उपरोक्त कसुरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा व अपिल ) नियम १९५६ मधिल नियम (३) (२) (v) मधील तरतूदीनुसार **"पुढील देय वार्षीक वेतनवाढ दोन (२) वर्षाकरिता (अपरिणामकारक) स्थगीतीची शिक्षा देण्यात येत आहे.**

अपचारी हे जर सदर शिक्षेने व्यथीत होत असतील तर ते आदेश मिळाल्याचे दिनांका पासून **६०** दिवसांचे आंत मा.विशेष पोलीस महानिरीक्षक, अमरावती परिक्षेत्र, अमरावती यांचेकडे अपिल अर्ज आमच्या मार्फतीने दोन प्रतीत सादर करु शकता.

**( एम.राज कुमार)**
पोलीस अधिक्षक, यवतमाळ

**प्रती:-** **सपोउपनि/६२ विजय राठोड,** नेमणुक पो.स्टे. दिग्रस.
**मार्फत :-** ठाणेदार, पो.स्टे. **दिग्रस.**
**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी
**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/ठाणेदार, पो.स्टे. आर्णी/आस्थापना लिपीक (कर्मचारी ) /सआली-०४/वेतन लिपीक-०१/

क्र :पोअय/डिपी/३१-बी/वि.चौ/अं.आ/पोशि-२२०० गणेश राठोड/ 6810 /२०२० यवतमाळ दि. 19 AUG 2020

## अंतिम आदेश

**अपचा-यांचे नांव :-** पोशि/२२०० गणेश राठोड, नेमणुक पो.स्टे. खंडाळा.

**दोषारोप :-**

आपण पोशि/२२०० गणेश राठोड, पोलीस स्टेशन बाभुळगाव येथे नेमणुकीस असतांना दिनांक ०४/०६/२०१५ पासुन दिनांक १७/०६/२०१५ पावेतो वरिष्ठांना कोणतीही पुर्वसुचना न देता अनधिकृतपणे कर्तव्यावर गैरहजर राहीलात. तसेच आपले बाभुळगाव येथील एका मुलीसोबत अनैतिक संबध असल्या करणाने परिसरातील लोकांमध्ये नाराजी पसरुन शिस्तप्रिय अशा पोलीस खात्याबाबत जनमानसात चुकीची भावना निर्माण होण्यास आपण कारणीभुत ठरले आहात. आपल्या अशा गैरकृत्यामुळे जनतेमध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नव्हीती.

उपरोक्त प्रकरणी या कार्यालयाचे आदेश क्र. डिपी/३१-बी/पोकॉ-२२०० गणेश/कसुरी/२०१५/११५१६, दिनांक ०५/०८/२०१५ अन्वये प्राथमीक चौकशी आदेशीत करण्यात येवुन सदर प्राथमीक चौकशीत अपचारी यांचे कृत्यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे निष्पन्न झाले आहे. पोलीस खात्यात असता अशोभनीय व गैरशिस्तीच्या वर्तना बाबत **आपणास पुढील देय वेतनवाढ ०१ वर्षाकरीता (पुढील वेतनवाढीवर परिणाम न करणारी) रोखणे ही शिक्षा का करण्यात येवु नये?** म्हणुन दिनांक ०४/०५/२०२० अन्वये कादानो देण्यात आली. सदरची कादानो स्विकारुन त्यावर स्पष्टिकरण दिनांक ०५/०८/२०२० या कार्यालयास सादर केलेले आहे. सदर स्पष्टिकरण हे अशंतः समाधानकारक असल्याने खालील प्रमाणे अंतिम आदेश पारीत करण्यात येत आहे.

### आदेश

मी पोलीस अधिक्षक, यवतमाळ याद्वारे, अपचारी पोशि/२२०० गणेश राठोड, यांना उपरोक्त कसूरी प्रकरणी मुंबई पोलीस (शिक्षा आणि अपिले ) नियम १९५६ मधिल तरतूदीनुसार **"सक्त ताकीद"** ही शिक्षा देत आहे.

प्रकरणी अपिल अनुज्ञेय नाही.

**( एम.राज कुमार)**
**पोलीस अधिक्षक, यवतमाळ.**

**प्रतीः-** **पोशि/२२०० गणेश राठोड,** नेमणुक पो.स्टे. खंडाळा.
**मार्फत :-** ठाणेदार, पोलीस स्टेशन **खंडाळा.**
**२/-** सोबत अंतिम आदेशाच्या २ प्रती पाठविण्यात येत असुन त्यातील एक एक प्रत कसुरदारास अदा करुन दुय्यम प्रतीवर दिनांकित स्वाक्षरी घेवून ती प्रत इकडील कार्यालयास विनाविलंब परत करावी.
**प्रत :-** पोउपअधि(मुख्या)/आस्थापना लिपीक (कर्मचारी )/सआली-०५/वेतन लिपीक- १ /डिपीजी लिपीक यांना उचित कार्यवाहीस्तव.

# भाग ६ - प्रशिक्षण व इतर

6795

क्रमांक : पोअय/पलि-७/परवानगी-मालमत्ता/ 6795 /२०२०, यवतमाळ,दि. 19 AUG 2020

## आदेश

खालीलप्रमाणे नमूद पोलीस कर्मचारी यांना त्यांनी केलेल्या विनंती अर्ज तसेच सादर केलेल्या कागदपत्राच्या आधारे त्यांचे नावासमोर दर्शिविल्याप्रमाणे खालीलप्रमाणे नमूद मालमत्ता घेण्याकरीता महाराष्ट्र नागरी सेवा १९७९ नियम क्रमांक १९ (२) (३) अन्वये परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र | पोलीस कर्मचारी यांचे नाव व पदनाम | पैशाचे विनीयोजन | ज्यासाठी परवानगी मिळणेबाबत अर्ज केला आहे त्याचे विवरण |
|---|---|---|---|
| १ | नापोकॉ/२५९ पंकज शामराव पातुरकर, नेमणूक स्थागुशा | १. सोबत जोडलेल्या नूसार स्वताचे वेतनातील बचतीमधून, कर्ज नातेवाइकाकडून | श्री.सुभाष चिंतामण झळके, रा.नागपूर यांचे मालकी हक्काचा मौजे बोरगडी प्र व ता.पुसद जि.यवतमाळ कक्षेतील सनं १९/१ व मधील वि.उपविभागीय अधिकारी पुसद यांचे दि.२६.०६.२००९ चे आदेशानूसार लेआऊट मधील प्लॉट क्र.३७ एकूण १९/१/ब/३७ १.५० चौमी रू.३ लाख मध्ये खरेदी करण्याची परवानगी |

(सदरची परवानगी हि कर्मचारी यांनी सादर केलेल्या कागदपत्राचे अधीन राहून देण्यात येत असून , भविष्यात सदरची कागदपत्रे हि खोटी आढळल्यास व कार्यालयाची दिशाभूल केल्याचे निदर्शनास आल्यास परवानगी रद्द करण्यात येऊन अर्जदाराविरूदध नियमानूसार कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी)

(मा.पोलीस अधीक्षक यांचे मान्यतेने)

(सुशिला पवार)
प्र.कार्यालय अधीक्षक
पोलीस अधीक्षक, यवतमाळ करीता

प्रति,
नापोकॉ/२५९ पंकज शामराव पातुरकर, नेमणूक स्थागुशा
मार्फत :- पोलीस निरीक्षक, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ
सदरची प्रत संबधीतास अदा करून पोच या कार्यालयास सादर करावी

प्रत :- डिपीजी लिपीक

प्रत :- सआली ०१ व नोंदणी लिपीक यांना सेवापटात नोंदी करीता